
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक




# दैनिक राजस्व

RNI. NO. MAHMAR 2011/39185




सोलापूर | वर्ष १४ वे | अंक – २६८ | मराठी सायंदैनिक | शनिवार १७ जानेवारी २०२६ | पाने ६ | किंमत २ रुपये

# जिथे भाजपची साथ सोडली, तिथे तिथे एकनाथ शिंदेंना फटका

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचे चित्र शुक्रवारी स्पष्ट झाले असून, या निकालांनी महायुतीमधील 'बड्या भावाची' ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.
ज्या ठिकाणी भारतीय जनता पार्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ सोडली, त्या बहुतांश ठिकाणी शिंदेसेनेला मोठ्या अपयशाचा सामना करावा लागला आहे.
नवी मुंबईपासून ते छत्रपती संभाजीनगरपर्यंत अनेक महत्त्वाच्या शहरात शिंदेसेनेचा रथ रोखला गेल्याचे पाहायला मिळत आहे.
मात्र छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार, मीरा भाईंदर यासह इतर प्रमुख महापालिकेत भाजपाने शिंदेसेनेची साथ सोडली. ज्यामध्ये शिंदेसेनेला फारसं यश हाती आले नाही.
राजकीय वर्तुळात आता अशी चर्चा सुरू झाली आहे की, भाजपने केवळ आपल्या सोयीसाठी मुंबई, ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीपुरतीच शिंदेंशी युती मर्यादित ठेवली होती का? या तिन्ही ठिकाणी दोन्ही पक्ष एकत्र लढले आणि त्यांना यशही मिळाले.
छत्रपती संभाजीनगरमध्ये निवडणुकीपूर्वीच भाजपने युती तोडल्याचा मोठा फटका शिंदेसेनेला बसला.
येथे शिंदेसेनेचे खासदार आणि जिल्ह्याचे पालकमंत्री असूनही पक्षाला केवळ १३ जागांवर समाधान मानावे लागले, तर भाजपने ५७ जागांसह मुसंडी मारली.
पुण्यात तर शिंदेसेनेला खातेही उघडता आले नाही, हे या निकालाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले.
थोडक्यात सांगायचे तर, जिथे भाजपची साथ मिळाली तिथे शिंदेसेनेची नौका पार लागली, मात्र जिथे मैत्री तुटली तिथे शिंदेंच्या शिलेदारांना मतदारांनी नाकारल्याचे दिसून येत आहे.



# ठाकरे बंधूंच्या पराभवानंतर अंबादास दानवेंची पोस्ट व्हायरल

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील महापालिका निवडणुकीच्या निकालाअंती बहुतांश ठिकाणी भाजपचंच कमळ फुलल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे २५ वर्षे ठाकरेंची एकहाती सत्ता असलेल्या मुंबई महानगरपालिकेत भाजप युतीनं ठाकरेंची सत्ता उलथवून लावलीय. तब्बल ८९ जागा मिळवत मुंबईत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. तर त्यापाठोपाठ उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्यात. त्यामुळे मुंबईचा महापौर हा महायुतीचाच होणार, हे आता जवळ जवळ स्पष्ट झालं आहे.
दुसरीकडे, बालेकिल्ला असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेला त्यांचा गड देखील राखता आला नाहीये. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाने ९४ जागांवर उमेदवार दिले होते. मात्र शिवसेना ठाकरे गटाला दोन आकडी विजयही मिळवता आलेला नाही. ठाकरे गटाला छत्रपती संभाजीनगरमध्ये केवळ सहा जागा मिळाल्या आहेत. यात शिवसेना नेते अंबादास दानवे यांनाही भावाच्या पराभवामुळे



फटका बसल्याचा दिसून आलंय. या सर्व पार्श्वभूमीवर अंबादास दानवे यांनी समाज माध्यमांवर एक भावनिक पोस्ट करत भाष्य केलंय. अंबादास दानवे यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंचा बाळासाहेबांसोबतचा एक फोटो आणि व्हिडीओ शेयर केलाय. यावर आपलेच फितूर निघाले तरी शेवटच्या श्वासापर्यंत लढू असं लिहलं आहे. ठाकरे बंधूंच्या पराभवानंतर अंबादास दानवेंची हि पोस्ट सध्या चर्चेत आली आहे.
एकीकडे बालेकिल्ला असलेल्या शिवसेनेला छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांचा गड राखता आला नाही. दुसरीकडे शिंदे गटाला ही छत्रपती संभाजीनगरमध्ये १३ जागाच मिळाल्या असून भाजपने बहुमताचा आकडा गाठल्याचा चित्र आहे. यावर बोलताना अंबादास दानवे म्हणाले कि, पराभव मान्य केला पाहिजे. ३५ ठिकाणी आम्ही दुसऱ्या क्रमांकावर राहिलो आहे. आमचे ७ ठिकाणी विजय झाले. आम्ही प्रचार चांगला केला होता, मात्र पैशाची वृष्टी भाजपच्या आकाशातून झाली. धो-धो पैशाचा पाऊस झाला. १४ तारखेला २५ टक्के मतदान झाल्याची घटना घडली, अशी तक्रार आहे. मतदान रीसेट झाले अशीही तक्रार झाली आहे. या शहराला भाजपने पाणी दिले नाही, तरी जनतेने भाजपला निवडून दिले आहे. जनतेच्या मनात काही असेल तर शुभेच्छा, असेही अंबादास दानवे म्हणाले.
मात्र, सत्तेपुढे शहाणपण टिकत नाही, हे सत्य आहे. हरलो हे आमचे आणि शिंदेंच्या शिवसेनेचे दुर्दैव आहे. यांच्याकडे सर्व उपलब्ध असताना ते ११,१२ पर्यंत पोहोचविले. आम्हला संपविले मात्र त्यांचे जे कलींग आहे. त्यांना तरी संपवायला नको होतं. येणाऱ्या काळात निवडून आलेले ७० लोक मुंबईला दिशा देतील. आमचे सगळे गेले तरी आम्ही ७० जगा जिंकल्या. हे काही कमी नाही. असेही ते म्हणाले.

# राज्यातील २९ महापालिकांचा निकाल लागताच मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० मोठे निर्णय

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१७ जानेवारी) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.
मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)-
अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास व संचालनालयाचे नाव अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय करण्यास मान्यता. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, नक्षलवाद विशेष कृति आराखडा कक्ष यांच्या कार्यालयांसाठी आवश्यक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध. (नियोजन विभाग)
अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय. वाहनधारकांना दिलासा (नगर विकास विभाग)
मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा – २ (एमयुटीपी -२) साठी सुधारित खर्चास व शासन हिस्सा उचलण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग)
तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी दिलेल्या उलवे येथील भुखंडासाठीचे शुल्क माफ (नगर विकास विभाग)
पीएम – ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एक हजार ई- बस सुविधेसाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबीट मॅन्डेट (डीडीएम) द्वारे संबंधित कंपन्यांना खर्चाची रक्कम मिळणार ( नगर विकास विभाग)
भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी ) येथे सर्वोपयोगी – मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देणार. व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लँट विकिरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी (महसूल विभाग)
यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटींची मान्यता. प्रकल्पामुळे पाच तालुकयातील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनवर्सनाचा प्रश्न मार्गी (जलसंपदा विभाग)
मुंबईतील पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकिय निवासस्थाने उपलब्ध होणार. मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी. मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकिय निवासस्थाने बांधली जाणार. ( गृह विभाग)
राज्यातील युवकांना परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलीटी अँण्ड अँडव्हान्समेंटस् – महिमा) स्थापन करण्यास मंजुरी. प्रशिक्षित, कुशल युवकांना जगभरातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी समन्वय व अमंलबजावणीसाठी संस्था काम करणार. (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)
अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता. महामंडळाला मुख्यालयाची व बहुउद्देशीय इमारत उभी करता येणार. ( नगर विकास विभाग)

# मुंबईत भाजप नंबर १, ठाकरे गट दुसऱ्या क्रमांकावर

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीपाठोपाठ आता महानगरपालिका निवडणुकांमध्येही भाजपनं जोरदार मुसंडी मारली. मुंबईसह राज्यातील तब्बल १९ महापालिकांमध्ये भाजपनं विजयी घोडदौड कायम ठेवली. सर्वात धक्कादायक म्हणजे देशातील सर्वात श्रीमंत महापालिका आणि तब्बल २५ वर्ष ठाकरेंची एकहाती सत्ता असलेल्या मुंबईत भाजप युतीनं ठाकरेंची सत्ता उलथवून लावलीय. ८९ जागा मिळवत मुंबईत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरलाय. तर त्यापाठोपाठ उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्यात. त्यामुळे मुंबईचा महापौर हा महायुतीचाच होणार असल्याचं स्पष्ट झालं. मुंबईची निवडणूक यंदा सर्वार्थानं वेगळी होती. तब्बल २० वर्षानंतर उद्धव आणि राज ठाकरेंनी एकत्र येत निवडणूक लढवली. ठाकरे बंधूंना ७१ जागी यश मिळालंय. तर पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातही अजित पवारांना मोठा धक्का देत भाजपनं एकहाती सत्तेचा सोपान गाठलाय. तर नागपूरमध्येही भाजपनं आपला गड अबाधित ठेवलाय. त्याचप्रमाणे संभाजीनगरमध्येही ठाकरेंच्या वर्चस्वाला शह देत सत्ता खेचून आणली.मुंबई महापालिकेची निवडणूक ९ वर्षांनी पार पडली.

# जालन्यात विजयी पराभूत समर्थक एकमेकांना भिडले

जालना महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत धक्कादायक प्रकार समोर आलाय. जालना शहरात महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर तणावाची परिस्थिती निर्माण झाली. प्रभाग क्रमांक १० मधील मिलन चौक परिसरात विजयी आणि पराभूत उमेदवारांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेत ६ ते ७ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली असून, सर्व जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार , काँग्रेसच्या विजयी उमेदवार अन्सारी फरहाना अब्दुल रऊफ यांच्या समर्थकांनी विजयाच्या आनंदात मिरवणूक काढली होती. ही मिरवणूक मिलन चौकात पोहोचताच शिंदे गटाच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांशी वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली, मात्र काही वेळातच परिस्थिती हाताबाहेर गेली आणि दोन्ही गटांमध्ये लाठ्या-काठ्यांनी हाणामारी सुरू झाली.



राजस्व



## संपादकीय

# विरोधकांसाठी मध्यंतराचा काळ!

उत्तर प्रदेशसह पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्यामुळे विरोधी पक्षांच्या भाजपविरोधी लढ्याला खीळ बसली असल्याचे कोणाला वाटू लागले तर चुकीचे नव्हे. भाजपविरोधक दोन पावले मागे गेले आहेत. आता राज्यसभेतही काँग्रेसच्या जागा कमी होतील. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधकांना उमेद–वार उभा करावा लागेल पण, उत्तर प्रदेशातील विजयानंतर भाजपच्या उमेदवाराला ही निवडणूक जिंकणे अवघड जाणार नाही.

या वर्षी नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये गुजरातमध्ये विधानसभेची निवडणूक असून तोपर्यंत तरी विरोधक विखुरलेले दिसू शकतील. गुजरातसह पुढील वर्षी होणाऱ्या मध्य प्रदेश, कर्नाटक, राजस्थान या तुलनेत मोठी राज्ये आणि

छत्तीसगढ इथल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्त–ाने विरोधकांच्या एकजुटीला पुन्हा वेग येऊ शकेल. हा काळ विरोधकांसाठी आत्मचिंतनाचा, आपापसांतील अंतर्विरोधाचा फेरविचार करण्याचा, पक्षांतर्गत वाद मिटवण्याचा,

भाजपविरोधी संघर्षाचा नव्याने विचार करण्याचा असेल.

हे पाहता विरोधकांमध्ये निर्माण झालेले राजकीय शैथिल्य अगदीच वायफळ ठरणार नाही. विरोधकांमध्ये असा परिपक्क विचार काही नेते करत आहेत. त्यांचे म्हणणे असे की, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही आपल्या मर्यादांचे आकलन व्हायला हरकत नाही.

पण, त्यासाठी चार–सहा महिन्यांचा काळ जावा लागेल! मग, पुन्हा एकदा भाजपविरोधी आघाडीची चर्चा होऊ शकेल.

भाजपविरोधी आघाडी म्हणत असताना प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांना काँग्रेसचे काय करायचे हा प्रश्न सतावत आहे. तृणमूल काँग्रेससारख्या पक्षांना काँग्रेसविना आघाडी केली पाहिजे असे वाटते. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने (आप) काँग्रेसला पराभूत करत सत्ता मिळवली आहे. दिल्ली आणि पंजाबमध्ये काँग्रेसवर मात केल्यामुळे ‘आप’ हाच काँग्रेसला पर्याय असेल असे ‘आप’चे नेते उघडपणे बोलू लागले आहेत. राज्यसभेत ‘आप’च्या खासदारांची संख्या किमान पाच सदस्यांनी वाढेल. ज्या राज्यांमध्ये काँग्रेस भाजपविरोधात अपयशी ठरेल तिथे मतदारांना ‘आप’ची निवड करता येईल असे सूचित केले जात आहे. तृणमूल काँग्रेस आणि ‘आप’ हे भाजपविरोधी पक्ष काँग्रेसविरोधी आहेत. या दोन्ही पक्षांना बिगरकाँग्रेस बिगरभाजप वेगळा राजकीय गट निर्माण करायचा आहे. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला जेमतेम दोन टक्के मते मिळाली.

देशातील सर्वात मोठय़ा राज्यामध्ये काँग्रेसचे अस्तित्व संपुष्टात येत असेल तर भाजपविरोधी एकजुटीसाठी काँग्रेसचा विचार तरी कशाला करायचा, असा प्रश्न हे पक्ष विचारत आहेत.

पण, राजस्थान व छत्तीसगढमध्ये काँग्रेसची सरकारे आ–हेत. पंजाब, मध्य प्रदेश, गुजरात, झारखंड, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, बिहार या राज्यांमध्ये काँग्रेसचे अस्तित्व नाकारता येत नाही. महाराष्ट्रामध्ये शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस अशा तीन पक्षांचे मिळून महाविकास आघाडी सरकार बनले आहे. भाजपच्या राज्यातील नेत्यांना हे सरकार पाडण्याची भलतीच घाई झालेली आहे, हे त्यांच्या वर्तनावरून, विधानांवरून दिसते. राज्य स्तरावर महाविकास आघाडी सरकारविरोधात भाजपचा आक्रमक पवित्रा कायम राहील, त्यातून सरकार पाडण्याचे प्रयत्न यशस्वी होतील असे नव्हे. महाराष्ट्रातील सरकार स्थापन करण्याबाबत केंद्रातील भाजप नेतृत्व कदाचित वेगळा विचार करत असावे.

## गुरु वचन

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.

## उपदेशकथा

### वक्तशीरपणा

‘तिसरी कसम’ या चित्रपटाचे चित्रीकरण बिहारमधील पूर्णिया जवळच्या जंगलात सुरू होते. दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांना अगदी पहाटेचे एक दृश्य चित्रित करायचे होते म्हणून त्यांनी नायक राजकपूर यांच्या स्वीय सहायकाला दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला हजर राहण्यास सांगितले. त्याने राजकपूरना हा निरोप देण्यास साफ इन्कार केला. ‘त्यांचा दिवस सकाळी अकरा वाजता सुरू होतो हे मला ठाऊक असताना माझी हिंमतच होणार नाही त्यांना पहाटे या म्हणून सांगायला.’ मग दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांनीच ते काम स्वीकारले. ते राजकपूरला म्हणाले, ‘उद्या मला दोन मोठ्या लोकांना बरोबर घेऊन काम करायचे आहे. वेळ पहाटे साडेपाचची आहे. मात्र, ती चुकली तर त्यातला एक मोठा माणूस निघून जाईल... एक मोठा माणूस म्हणजे साक्षात् सूर्यनारायण व दुसरे आपण स्वत: आहात.’ दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला सर्वांच्या आधी राजकपूर स्वत: पोहोचलेले होते. एवढेच नाही तर संपूर्ण युनिटसाठी त्यांनी चहादेखील तयार ठेवलेला होता. सर्वांना शरमल्यासारखं झालं. राजकपूर कामात आपलं भान हरपून जातात हे साऱ्यांना पुन्हा एकदा कळलं.

**तात्पर्य:मोठी माणसं आपल्या कामाला नेहमी सर्वोच्च महत्व देतात.**

## ऑनलाईन शॉपिंग करण्यापूर्वी जाणून घ्या ‘या’ गोष्टी, नाहीतर होईल फसवणूक

अवघ्या काही
दिवसात देशभरात
सणासुदांचा धुमधडाका उडणार आहे.
त्या दरम्यान आपल्यापैकी अनेकजण ऑनलाईन
शॉपिंगलाचा सर्वाधिक पसंती देणार आहेत यात काडीमात्र शंका नाही.

पण ही शॉपिंग करताना तुम्हाला खूप काळजी घ्यावी लागेल नाहीतर तुमची फसवणूक होऊ शकता. कारण ऑनलाईन सेलमधून वस्तू खरेदी करुन काही

ग्राहकांची फसवणूक झाल्याच्या घटना गेल्या काही वर्षात घडल्या आहेत. २०१४ नंतर भारतात ऑनलाईन शॉपिंगचा ट्रेन्ड अधिक वाढत गेला. तर येत्या दोन–तीन दिवसात अॅमेझॉन आणि फ्लिपकार्टवर फेस्टिव्ह सीजन सेलला सुरुवात होणार आहे. या दोन्ही ई– कॉमर्स वेबसाइटवर २९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोंबर दरम्यान

फेस्टिव्ह सीजन सेलचे आयोजन करण्यात आले आहे. बरेच इलेक्ट्रॉनिक प्रोडक्टससह फॅशन, होम अप्लायंसेज पर्यंतच्या सर्व गोष्टींवर या सेलमध्ये सुट देण्यात येणार आहे.

जगभरातील मोठ्या कंपन्यामधील वॉलमार्ट, अलीबाबा, अॅमेझॉन ऑनलाईन पद्धतीने शॉपिंगच्या व्यवहारामुळे भारतात गुंतवणूक करण्यासाठी पुढे येत आहेत. पण गेल्या वर्षात ३० जुलैला सरकारकडून ऑनलाईन सेक्टरच्या नियमाबाबत एक पॉलिसी बनली आहे. या पॉलिसीनुसार ऑनलाईन शॉपिंगच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणूकीपासून वाचणे हा महत्वाचा मुद्दा आहे. तर ऑनलाईन सेलमधून वस्तू घेण्यापूर्वी जाणून घ्या ‘या’ गोष्टी नाहीतर फसवणूक होण्याची फार शक्यता असते.

ऑनलाईन शॉपिंग करताना बहुतांश ग्राहक एखाद्या प्रोडक्टसाठी रेटिंग किती दिली आहे हे तपासून पाहतात. रेटिंग जर उत्तम असेल तर ग्राहक खरेदी करण्याचा विचार करतात.

पण ऑनलाईन साईटवर प्रोडक्टबाबत देण्यात आलेली रेटिंग काही वेळेस फेक असतात.

ऑनलाईन खरेदी करताना काही ग्राहक त्याचा रिव्हू किंवा फोटो पाहूनच ती वस्तू खरेदी करतात. पण असे केल्यास काही वेळेस खरेदी केलेले प्रोडक्टस उत्तम दर्जाचे नसल्याचे दिसून येते. ती वस्तू अशा परिस्थितीत परत देण्यासाठी ई–कॉमर्स कंपन्या नाटक करतात.

तुम्हाला जर ऑनलाईन पद्धतीने खरेदी केलेली वस्तू ग्राहकांकडून परत केली जाते. ग्राहकाला त्यानंतर १४ दिवसात त्या वस्तू बाबत रिफंड देणे अनिवार्य आहे. त्याचसोबत ग्राहकांच्या तक्रारीवर ३० दिवसाच्या आतमध्ये तोडगा काढणे सुद्धा गरजेचे आहे. तसेच तुम्ही ज्या व्यक्तीकडून प्रोडक्ट खरेदी करत असल्यास त्याची संपूर्ण माहिती त्याला देणे सुद्धा आवश्यक आहे.

त्यामुळे रिप्लेसमेंट पॉलिसीबाबत प्रत्येक ग्राहकाने अधिक जाणून घेणे अत्यावश्यक आहे.

तसेच एखादे प्रोडक्ट खरेदी करण्यापूर्वी अन्य ठिकाणी सुद्धा त्याबाबत अधिक माहिती घ्या. तर कोणत्याही ब्रॅन्डची वस्तू खरेदी करत असल्यात त्याच्या शॉपिंग पोर्टल किंवा जागेची माहिती घ्या. त्याचसोबत खरेदी करणाऱ्या वस्तूचा ब्रॅन्ड विश्वासनीय असेल तरच खरेदी करा.

त्याचबरोबर अॅमेझॉन आणि फ्लिपकार्ट या दोन्ही कंपन्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खरेदी करत असल्यास त्यांच्या रिर्टन
पॉलिसीबाबत जाणून घ्या.

# कथा ‘चार्ली’ नामक झपाटलेल्या बाहुल्याची !

१९६८ सालची ही घटना, एखाद्या भयपटामध्ये शोभेल अशी आहे. त्यावर्षी अपस्टेट न्यूयॉर्कमधील एका टुमदार व्हिक्टोरियन घराच्या माळ्यावर नक्की काय काय सामान पडले हे पाहण्यासाठी माळ्यावर चढून आलेल्या घरातील मंडळींना एक जुनाट लोखंडी ट्रंक सापडली. या ट्रंकमध्ये जुनी कागदपत्रे, वर्तमानपत्रे ठेवलेली होती. आणखी काय सामान या ट्रंकमध्ये भरले आहे हे पाहत असतानाच ट्रंकच्या तळाशी ठेवलेला एक जुनाट बाहुला, आणि त्या बाहुल्यावर ठेवलेला, कालांतराने पिवळा पडलेला एक कागद घरमालकाला आढळला. त्या कागदावर कसली तरी प्रार्थना लिहिल्यासारखे वाटत होते. हा कागद या

बाहुल्यावर का ठेवला असावा, याचा अंदाज घरमालकाला लावता येईना. ट्रंकमध्ये सापडलेल्या वृत्तपत्रांवरील तारीख १९३० सालची, म्हणजेच सुमारे अडतीस वर्षांपूर्वीची होती. मात्र हा बाहुला किती जुना असेल हे सांगणारा कोणताही पुरावा या ट्रंकेत आढळला नव्हता.

त्या घरामध्ये राहण्यासाठी आलेल्या मनुष्याचा कुटुंबाचा पसारा मोठा होता. तो स्वत:, त्याची पत्नी, आणि त्याच्या पाच मुली असा हा मोठा परिवार होता. घरमालकाला आणि त्याच्या परिवाराला जुन्या बाहुल्यांचा संग्रह करण्याची आवड होती, त्यामुळे माळ्यावरील ट्रंकेमध्ये सापडलेल्या बाहुल्याला त्यांच्या या संग्रहामध्ये मोठ्या आनंदाने समाविष्ट करून घेतले गेले, आणि इतर बाहुल्यांप्रमाणे त्याचेही नामकरण करण्यात आले. ‘चार्ली’ असे नामकरण केला गेलेला हा बाहुला इतर बाहुल्यांच्या प्रमाणेच, खास बाहुल्यांसाठी तयार करण्यात आलेल्या बेंचवर विराजमान झाला. काही दिवसांनी मात्र चार्ली त्याच्या बेंच व्यतिरिक्त इतर अनेक ठिकाणी आढळून येऊ लागला. कधी चार्ली खुर्चीवर असे, तर कधी दिवाणखान्यातील एखाद्या कोपऱ्यात बसलेला दिसे. सुरुवातीला, घरातील लहान मुलींपैकी कोणी तरी वारंवार चार्लीला निरनिराळ्या ठिकाणी उचलून ठेवत असेल असे घरमालकाला वाटले. मात्र आपण चार्लीला त्याच्या जागेवरून अजिबात हलविले नसून, त्याची जागा वारंवार कशी बदलते हे आपल्याला ठाऊक नसल्याचे सर्व

मुलींनी ठामपणे सांगितले. घरमालकाने ही या विषयाची अधिक चर्चा न करता हा विषय तिथेच थांबविला. काही काळ शांततेत उलटून गेला, आणि चार्लीचा विषय अचानक घरामध्ये पुन्हा निघाला. घरमालकाच्या सर्वात धाकट्या मुलीने सर्वांना जे काही सांगितले, ते ऐकून सर्वच जण चक्रावले. जेव्हा रात्री बाथरूममध्ये जाण्यासाठी हे मुलगी उठली, तेव्हा चार्ली तिथे असून, तो आपल्याशी बोलला असल्याचे तिने सांगितले. तिच्या आई वडिलांचा आणि इतर बहिणींचा तिच्यावर अर्थातच विश्वास बसला नाही. ती आपल्या मनाने काही तरी कल्पना रंगवून सांगत असल्याची खात्री सर्वांना होती. दिवस सरत होते. घरमालकाने आणि त्याच्या पत्नीने चार्लीच्या कोणत्याच हालचाली कधीही अनुभवल्या नसल्या, तरी सर्वात धाकट्या लेकीप्रमाणे चार्लीच्या करामतींचा अनुभव घरातील इतर मुलींना ही येऊ लागला होता. त्यामुळे या मुली चार्लीच्या आसपास ही फटकत नसत. रात्रीच्या वेळी उठून बाथरूममध्ये जाण्याचा तर सर्वच मुलींनी धसकाच घेतला होता. आईवडिलांना त्यांच्या मुलींच्या वागण्यातील या बदलाचे कारण समजत नव्हते. त्यांनी स्वत: चार्लीला हालताना , बोलताना कधीच पहिले नसल्याने मुलींची भीती त्यांना समजत नव्हती. त्यानंतर जे घडले ते पाहून मात्र घरमालकाला चार्लीचा कायमचा बंदोबस्त करण्याचा निर्णय घ्यावाच लागला. एका रात्री त्याच्या सर्वात धाकट्या मुलीचे किंचाळणे ऐकून सर्व जण धावतच तिच्या जवळ पोहोचले. तिच्या अंगभर उठलेले, रक्ताळलेले ओरखडे पाहून सर्व मंडळी घाबरून गेली. पण खरी भयंकर गोष्ट तर पुढेच होती. हे ओरखडे घरातल्या पाळीव मांजराने ओचकारल्यामुळे नसून, चार्लीने ओचकारल्यामुळे आले असल्याचे जेव्हा या मुलीने सांगितले, तेव्हा मात्र सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. खरे काय घडले असावे याची कल्पना कोणालाही नव्हती. पण तरीही मुलींची घाबरलेली अवस्था पाहून घरमालकाने चार्लीला त्वरित माळ्यावरील ट्रंकेत नेऊन टाकले आणि ट्रंकेला भले मोठे कुलूप ठोकले. कालांतराने परिस्थिती सामान्य झाली, आणि माळ्यावरील ट्रंकमध्ये ठेवलेल्या चार्लीचा सर्वांना विसरही पडला. जेव्हा मुली मोठ्या झाल्या, घर सोडून इतरत्र स्थायिक झाल्या, तेव्हा घरमालकानेही आपले घर विकण्यास काढले. घरातील अनावश्यक वस्तूंची विक्री करण्यासाठी ‘गॅरेज सेल’ सुरु केला. या सेलमध्ये विकण्यास ठेवण्यात आलेल्या वस्तूंमध्ये माळ्यावरील ट्रंकही होती. या ट्रंकमध्ये अस–लेला चार्ली एका वृद्ध महिलेला पाहताक्षणी पसंत पडला.

ही महिला देखील जुन्या बाहुल्यांची संग्राहक असल्याने चार्लीसाठी हवी तितकी किंमत
मोजण्याची तयारी तिने दर्शिविली.

घरमालकाने योग्य मोबदला घेऊन चार्लीला या महिलेच्या हवाली केले, आणि त्याचबरोबर आपल्या घरामध्ये घडलेल्या सर्व हकीकतीही सविस्तर कथन केल्या. त्यानंतरही चार्ली बाहुल्याची पुढे अनेकदा खरेदी–विक्री करण्यात आली, आणि चार्ली सोबतच त्याच्याशी निगडित सर्व कथाही अनेक लोकांपर्यंत पोहोचल्या.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

# सोलापूर महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक २०२६

## प्रभाग १ अ

| | | |
|---|---|---|
| गौतम कसबे | भाजप | ८४५२ (विजयी) |
| सुजीत अवघडे | राष्ट्रवादी | २०६१ |
| रमेश व्हटकर | ठाकरे गट | १९०६ |
| रवींद्र गायकवाड | वंचित | ३८०३ |
| बबलू गायकवाड | बीएसपी | ६४७ |
| विजय गादेकर | अपक्ष | १५७८ |
| देविदास चिंचोळकर | अपक्ष | १५८ |

## प्रभाग १ ब

| | | |
|---|---|---|
| राजश्री कणके | भाजप | ९७५० (विजयी) |
| नंदा कांगरे | राष्ट्रवादी | १५०२ |
| आरती वीटकर | ठाकरे गट | १९०३ |
| किरण रुपनर | वंचित | ४०४९ |
| शहनाज मोमीन | बीएसपी | ९०४ |
| श्वेता कवठे | अपक्ष | ६३९ |

## प्रभाग १ क

| | | |
|---|---|---|
| पूनम काशीद | भाजप | ८०२९ (विजयी) |
| सपना कोळी | शिवसेना | १९६९ |
| शुभांगी जाबा | काँग्रेस | १००८ |
| शुभांगी कळंब | राष्ट्रवादी | १६०१ |
| शिलवंता गायकवाड | वंचित | ३५९८ |
| भगीरथी शिंदे | बीएसपी | ८५० |
| छाया चव्हाण | अपक्ष | ११३ |
| सुकन्या तांबे | अपक्ष | १७०९ |

## प्रभाग १ ड

| | | |
|---|---|---|
| अविनाश पाटील | भाजप | ७०४७ (विजयी) |
| संजय सरवदे | शिवसेना | १५६९ |
| सिध्दाराम आनंदकर | राष्ट्रवादी | १४७२ |
| राकेश सोनी | राष्ट्रवादी | ८९५ |
| सुहास सावंत | वंचित | ३८७८ |

## प्रभाग २ अ

| | | |
|---|---|---|
| नारायण बनसोडे | भाजप | ११७९० (विजयी) |
| प्रशांत कावळे | ठाकरे गट | ३२७४ |
| नीलेश होटकर | राष्ट्रवादी | १७६३ |

## प्रभाग २ ब

| | | |
|---|---|---|
| कल्पना कारभारी | भाजप | १२४८३ (विजयी) |
| संध्या भोसले | मनसे | ४१३० |

## प्रभाग २ क

| | | |
|---|---|---|
| शालन शिंदे | भाजप | १०७७० (विजयी) |
| आफरिन पठाण | शिवसेना | ४०७० |
| हमिदा पटेल | अपक्ष | १९२० |

## प्रभाग २ ड

| | | |
|---|---|---|
| डॉ. किरण देशमुख | भाजप | १०९२० (विजयी) |
| गणेश कुलकर्णी | शिवसेना | ३०६५ |
| दिनेश चव्हाण | ठाकरे | २१२० |
| जयश्री भोसले | अपक्ष | ८७७ |

## प्रभाग ३ अ

| | | |
|---|---|---|
| राजू पाटील | भाजप | ८६८४ (विजयी) |
| सुरेश बिद्री | शिवसेना | ४४८६ |
| रोहित कारमपुरी | काँग्रेस | २१९० |
| दशरथ जमादार | अपक्ष | ४६१२ |

## प्रभाग ३ ब

| | | |
|---|---|---|
| स्वाती बडगु | भाजप | ९९२६ (विजयी) |
| उर्वशी पाटील | शिवसेना | ७६८१ |
| महानंदा शिरसीकर | काँग्रेस | २१७६ |

## प्रभाग ३ क

| | | |
|---|---|---|
| रंजिता चाकोते | भाजप | १५२४५ (विजयी) |
| रमाबाई पांडगळे | काँग्रेस | ३५६१ |

## प्रभाग ३ ड

| | | |
|---|---|---|
| संजय कोळी | भाजप | ८०५० (विजयी) |
| सुर्यकांत पाटील | शिवसेना | ८०३१ |
| सिध्दाराम चाकोते | काँग्रेस | २१२६ |
| जुबेर पटेल | आप | ७८० |
| शहानवाज कंपली | अपक्ष | ७५३ |

## प्रभाग ४ अ

| | | |
|---|---|---|
| वंदना गायकवाड | भाजप | ११४२३(विजयी) |
| संघमित्रा चौधरी | काँग्रेस | ६३८ |
| कविता चंदनशिवे | राष्ट्रवादी | ४३५७ |
| पल्लवी सुरवसे | वंचित | १०८९ |
| सुरेखा बाळशंकर | बीएसपी | ५१९ |

## प्रभाग ४ ब

| | | |
|---|---|---|
| विनायक विटकर | भाजप | ११११४ (विजयी) |
| सुशील बंदपट्टे | राष्ट्रवादी | ४४८१ |
| मल्लिकार्जुन हिरेमठ | वंचित | १९७३ |
| केदार म्हमाणे | अपक्ष | ४१० |

## प्रभाग ४ क

| | | |
|---|---|---|
| ऐश्वर्या साखरे | भाजप | १०१७७ (विजयी) |
| सारिका फुटाणे | राष्ट्रवादी | ४५२३ |
| प्रिया बसवंती | ठाकरे गट | ६२२ |
| रेश्मा मुल्ला | बीएसपी | ११५२ |
| पूजा धोत्रे | वंचित | १६०७ |

## प्रभाग ४ ड

| | | |
|---|---|---|
| अनंत जाधव | भाजप | १११११३ (विजयी) |
| विश्वनाथ बिडवे | राष्ट्रवादी | ४२९४ |
| धम्मपाल इंगळे | वंचित | २०७३ |
| देवेंद्र लोंढे | रासप | ९८ |

## प्रभाग ५ अ

| | | |
|---|---|---|
| समाधान आवळे | भाजप | ८०७० (विजयी) |
| आनंद चंदनशिवे | राष्ट्रवादी (अप) | ४८३९ |
| प्रणा बंगाळे | काँग्रेस | ३७२ |
| नागेश पाटोळे | वंचित | ४५८ |
| शिवम सोनकांबळे | रिपाइं | २११६ |
| चंद्रशेखर उघडे | बीएसपी | १६१८ |
| नागनाथ क्षीरसागर | अपक्ष | ४८६ |

## प्रभाग ५ ब

| | | |
|---|---|---|
| अलका भंवर | भाजप | ७१८३ (विजयी) |
| भाग्यश्री काळे | राष्ट्रवादी | ३६७२ |
| संपदा खांडेकर | राष्ट्रवादी (शप) | ५४८ |
| दर्शना दुगाणे | बीएसपी | २१११ |
| अर्चना राजपूत | रिपाइं | १९३१ |
| शीतल झाडगे | अपक्ष | २८७३ |

## प्रभाग ५ क

| | | |
|---|---|---|
| मंदाकिनी तोडकरी | भाजप | ७८९१ (विजयी) |
| महादेवी रणदिवे | राष्ट्रवादी | २७४५ |
| अनुजा तोडकरी | ठाकरे गट | ७६७ |
| प्रज्ञा लोंढे | बीएसपी | १७४५ |
| माधवी काळे | रिपाइं | १७५५ |
| पौर्णिमा हरिजन | वंचित | ६८८ |
| सरस्वती सुरवसे | अपक्ष | २८१३ |

## प्रभाग ५ ड

| | | |
|---|---|---|
| बिज्जू प्रधाने | भाजप | ६२०१ (विजयी) |
| गणेश पुजारी | राष्ट्रवादी | ३३६३ |
| महेश मुंदडा | बसपा | १६१० |
| परमेश्वर सावंत | ठाकरे गट | ३०० |
| सुजित कोकरे | रिपाइं | १५०२ |
| राजू अलुरे | अपक्ष | ५३६६ |
| श्रीकांत मोरे | अपक्ष | ११२ |

## प्रभाग ६ अ

| | | |
|---|---|---|
| सोनाली गायकवाड | भाजप | ८९४० (विजयी) |
| अनिता गवळी | शिवसेना | ६७९२ |
| रेणुका शिराळकर | वंचित | ९३३ |
| मंगल बंगाळे | अपक्ष | १६०१ |
| किर्ती शिंदे | अपक्ष | ११०१ |

## प्रभाग ६ ब

| | | |
|---|---|---|
| सुनील खटके | भाजप | ९४२२ (विजयी) |
| हर्षल गायकवाड | शिवसेना | ७४१५ |
| भाग्यश्री पांढरे | बसपा | १०१९ |
| अमोल पूदे | आप | ३१० |
| सलिम नदाफ | अपक्ष | ३१२ |
| अंकुश राठोड | अपक्ष | ५६४ |

## प्रभाग ६ क

| | | |
|---|---|---|
| मृण्मयी गवळी | भाजप | ९६०५ (विजयी) |
| पूजा चव्हाण | शिवसेना | ६३४३ |
| कविता उघडे | वंचित | १६०७ |
| राधिका गुळ्ळोळे | अपक्ष | २१२ |
| सुनीता दळवी | अपक्ष | २४६ |

## प्रभाग ६ ड

| | | |
|---|---|---|
| गणेश वानकर | भाजप | ९२८१ (विजयी) |
| मनोज शेजवाल | शिवसेना | ७९७५ |
| विशाल गायकवाड | आप | ४०८ |
| एकनाथ गेजगे | अपक्ष | ३४२ |
| मनोजकुमार तम्मेवार | अपक्ष | ७८ |
| बाबू पोथगुळी | अपक्ष | २५७ |
| शार्दुल साबळे | अपक्ष | १८० |
| मनोहर सपाटे | अपक्ष | ७४७ |

## प्रभाग ७ अ

| | | |
|---|---|---|
| अनिकेत पिसे | शिवसेना | ९८९७ (विजयी) |
| आनंद कोलारकर | भाजप | ७७६३ |
| सुमित भोसले | राष्ट्रवादी (शप) | १२१० |
| सूरज बंडगर | अपक्ष | ११६ |

## प्रभाग ७ ब

| | | |
|---|---|---|
| श्रध्दा पवार | भाजप | ९८७६ (विजयी) |
| मनीषा कणसे | राष्ट्रवादी | ७७०८ |
| मनीषा माने | राष्ट्रवादी (शप) | ११७० |
| मनीषा भोसले | रासप | ११३ |

## प्रभाग ७ क

| | | |
|---|---|---|
| मनोरमा सपाटे | शिवसेना | ८६२९ (विजयी) |
| उत्तरा बचुटे (बरडे) | भाजप | ८५४१ |
| शीतल गादेकर | राष्ट्रवादी (शप) | १५२० |

## प्रभाग ७ ड

| | | |
|---|---|---|
| अमोल शिंदे | शिवसेना | ११३८० (विजयी) |
| पद्माकर काळे | भाजप | ७४७७ |

## प्रभाग ८ अ

| | | |
|---|---|---|
| अमर पुदाले | भाजप | १२९२२ (विजयी) |
| उमेर सय्यद | राष्ट्रवादी | २१८५ |
| शेरू कुरेशी | राष्ट्रवादी | ५८३४ |
| इम्रान हवालदार | एमआयएम | १०८९ |

## प्रभाग ८ ब

| | | |
|---|---|---|
| गीता गवई | भाजप | ११६३९ (विजयी) |
| मेघा बेळमकर | ठाकरे गट | ३०३३ |
| उल्फत सौदागर | राष्ट्रवादी | ६०६१ |
| बालमनी कस्सा | अपक्ष | १४७ |
| सुप्रिया विभुते | अपक्ष | ६४८ |
| फिरोजाबी शेख | अपक्ष | ३४० |

## प्रभाग ८ क

| | | |
|---|---|---|
| बबिता धुम्मा | भाजप | १२५५८ (विजयी) |
| गोदावरी मोकाशी | काँग्रेस | ७००४ |
| सुषमा हिबारे | मनसे | १७८६ |
| सीमा धुळम | अपक्ष | २२१ |

## प्रभाग ८ ड

| | | |
|---|---|---|
| प्रविण दर्गोपाटील | भाजप | ११८११ (विजयी) |
| शशिकांत बिराजदार | ठाकरे गट | २६३३ |
| एमएमडी मुतवल्ली | राष्ट्रवादी | ५२४६ |
| बशीर शेख | एमआयएम | १९३७ |
| हेमंतकुमार अडकी | अपक्ष | ६६ |
| जुनेद अल्लोळी | अपक्ष | १३१ |

## प्रभाग ९ अ

| | | |
|---|---|---|
| शेखर इगे | भाजप | १५३८८ (विजयी) |
| दत्तू बंदपट्टे | काँग्रेस | ४८९० |
| अबोली मंजेली | राष्ट्रवादी | ७४५ |

## प्रभाग ९ ब

| | | |
|---|---|---|
| कादंबरी मंजेली | भाजप | १५३८३ (विजयी) |
| लक्ष्मी बडगु | राष्ट्रवादी | २३३६ |
| गीता वासम | माकप | २८४७ |
| सावित्री पलाटी | अपक्ष | ३४० |

## प्रभाग ९ क

| | | |
|---|---|---|
| पूजा वाडेकर | भाजप | १४८२३ (विजयी) |
| भानुप्रिया बोगा | राष्ट्रवादी | २३१८ |
| अरुणा आडम | माकप | ३५२६ |

## प्रभाग ९ ड

| | | |
|---|---|---|
| मेघनाथ येमूल | भाजप | ११८३८ (विजयी) |
| तुषार जक्का | राष्ट्रवादी | ६९८ |
| सुरेश गायकवाड | ठाकरे गट | १३२८ |
| आकाश इंगळे | अपक्ष | १४३ |
| अशोक कलशेट्टी | अपक्ष | ५० |
| रवी पात्रे | अपक्ष | ७८ |
| शिवराज बिराजदार | अपक्ष | २९५ |
| अरविंद शिंदे | अपक्ष | ६६४५ |

## प्रभाग १० अ

| | | |
|---|---|---|
| उज्वला दासरी | भाजप | १५२५५ (विजयी) |
| अरुणा कोंडले | अपक्ष | ११९१ |
| रुचिरा मासम | अपक्ष | २८३१ |

## प्रभाग १० ब

| | | |
|---|---|---|
| दीपीका यलदंडी | भाजप | १३५३३ (विजयी) |
| प्रिती देवकते | काँग्रेस | १८९१ |
| दीपाली जाधव | राष्ट्रवादी | १२११ |
| कृष्णवेणी कोंडा | शिवसेना | २५२० |
| लक्ष्मीबाई बाबरे | अपक्ष | ३३० |

## प्रभाग १० क

| | | |
|---|---|---|
| सतीश सिरसिल्ला | भाजप | १०५५३ (विजयी) |
| रुपेशकुमार भोसले | राष्ट्रवादी | १३९७ |
| हेमलता गायकवाड | शिवसेना | १४७५ |
| विठ्ठल कोठा | अपक्ष | ६२७१ |

## प्रभाग १० ड

| | | |
|---|---|---|
| प्रथमेश कोठे | भाजप | १४८८१ (विजयी) |
| शंकर बटगिरी | शिवसेना | १६०१ |
| विजयकुमार अंकम | अपक्ष | ५५८ |
| विजय इप्पाकायल | अपक्ष | २३९५ |

## प्रभाग ११ अ

| | | |
|---|---|---|
| युवराज सरवदे | भाजप | ८५६१ (विजयी) |
| (रियाज) अहमद मोमीन | राष्ट्रवादी | ३४२७ |
| लोकेश नंदाल | शिवसेना | ३५३८ |
| शुभम स्वामी | ठाकरे गट | १५६७ |

## प्रभाग ११ (ब)

| | | |
|---|---|---|
| शारदा रामपुरे | भाजप | ८६०२ (विजयी) |
| कल्पना रव्वा | काँग्रेस | १८६७ |
| दीपीका माळी | शिवसेना | २९९२ |
| लक्ष्मी बनसोडे | राष्ट्रवादी | २३८१ |
| जैतुन शेख | अपक्ष | ११९५ |

## प्रभाग ११ क

| | | |
|---|---|---|
| मीनाक्षी कडगंची | भाजप | ११४२४ (विजयी) |
| सोनाली नवले | ठाकरे गट | १७२२ |
| रईसा शेख | राष्ट्रवादी | ३३७९ |

## प्रभाग ११ ड

| | | |
|---|---|---|
| अजय पोन्नम | भाजप | ९८६७ (विजयी) |
| धोंडप्पा तोरणगी | काँग्रेस | ३०६० |
| राजेंद्र कलंत्री | राष्ट्रवादी | २५५१ |
| अब्बासअली यादगीर | प्रहार | ११५५ |
| इम्तियाज यादगिर | अपक्ष | ४१३ |

## प्रभाग १२ अ

| | | |
|---|---|---|
| विनायक कोंड्याल | भाजप | १६३११ (विजयी) |
| श्रीनिवास पोतन | शिवसेना | २०३० |
| प्रसाद माने | ठाकरे गट | १३६७ |
| काशिनाथ झाडबुके | अपक्ष | १६९ |

## प्रभाग १२ ब

| | | |
|---|---|---|
| सारिका खजुरगी | भाजप | १४८२८ (विजयी) |
| अमिता जगदाळे | ठाकरे गट | १४३७ |
| दामिनी जवळकर | शिवसेना | २६८८ |
| रेणुका अंजनाळकर | अपक्ष | १९६ |
| शशिकला कसपटे | अपक्ष | ४४१ |
| पूजा चव्हाण | अपक्ष | २०१ |
| मंदिरा साळुंके | अपक्ष | ८२ |

## प्रभाग १२ क

| | | |
|---|---|---|
| अर्चना वडनाल | भाजप | १५४१२ (विजयी) |
| स्नेहा श्रीराम | शिवसेना | ३९४६ |

## प्रभाग १२ ड

| | | |
|---|---|---|
| सिध्देश्वर कमटम | भाजप | १३०३९ (विजयी) |
| मौलाली पटेल | काँग्रेस | २३५९ |
| डॉ.राजेश अनगिरे | शिवसेना | ४१०८ |
| आनंद धोत्रे | अपक्ष | ४५९ |

## प्र.१३ अ

| | | |
|---|---|---|
| सुनीता कामाठी | भाजप | ११४६६ (विजयी) |
| गीता म्हेत्रे | शिवसेना | २१२३ |
| सुषमा सरवदे | माकप | २६९२ |

## प्रभाग १३ ब

| | | |
|---|---|---|
| अंबिका चौगुले | भाजप | ९३८३ (विजयी) |
| शिवम्मा बंदपट्टे | शिवसेना | २५१७ |
| अनिता आडम | माकप | ४१८९ |

## प्रभाग १३ क

| | | |
|---|---|---|
| सत्यनारायण गुर्रम | भाजप | १०२७० (विजयी) |
| जयंत होले-पाटील | शिवसेना | २३२६ |
| श्रीनिवास म्हेत्रे | माकप | ३६१७ |

## प्रभाग १३ ड

| | | |
|---|---|---|
| विजय चिप्पा | भाजप | ९२६२ (विजयी) |
| श्रीधर आरगोंडा | शिवसेना | २१३८ |
| इम्रान पठाण | राष्ट्रवादी | ३२४० |
| वल्लभ चौगुले | ठाकरे गट | १३०८ |
| प्रशांत जमादार | अपक्ष | १४७ |
| निरंजन बोध्दुल | अपक्ष | ३३६ |
| अशोक माचण | अपक्ष | ६६ |
| गणेश म्हेत्रे | अपक्ष | १२४ |

## प्रभाग १४ अ

| | | |
|---|---|---|
| अकीला भागनगरी | एमआयएम | ७९३० (विजयी) |
| विजयलक्ष्मी कंदलगी | भाजप | ४९१० |
| कुदुसिया मणियार | काँग्रेस | ५८५८ |
| नसीमा कुरेशी | राष्ट्रवादी | २५२८ |

## प्रभाग १४ ब

| | | |
|---|---|---|
| असिफ शेख | एमआयएम | ६२९८ (विजयी) |
| चेतन पडवळकर | भाजप | ४९०२ |
| नसीम खलिफा बागवान | काँग्रेस | ४४८३ |
| सैफोद्दीन मणियार | राष्ट्रवादी | १३१५ |
| राजासाहेब बागवान | समाजवादी | ६०९ |
| अश्पाक बागवान | आप | ३५८४ |

## प्रभाग १४ क

| | | |
|---|---|---|
| वाहिदाबानो शेख | एमआयएम | ९०२० (विजयी) |
| श्रध्दा साका | भाजप | ४८४५ |
| शहजादी बेगम बडेपीर | काँग्रेस | ५५६४ |
| सादिका शेख | राष्ट्रवादी | १५९८ |
| विजया बंगाळे | महाराष्ट्र आघाडी | ९५ |
| फातिमा दिना | अपक्ष | १५४ |

## प्रभाग १४ ड

| | | |
|---|---|---|
| तौफिक हत्तुरे | एमआयएम | ६५६३ (विजयी) |
| तुषार पवार | भाजप | ४९४१ |
| शोएब महागामी | काँग्रेस | ६१४१ |
| कलीम उस्मान तुळजापुरे | राष्ट्रवादी | १३१९ |
| रियाज खरादी | समजवादी | ६०२ |
| जुबेर हिरापुरे | आप | १३७८ |
| रफिक मोहोळकर | अपक्ष | १३३ |
| चाँदसाब मुजावर | अपक्ष | ४८ |
| म. रफिक मोहोळकर | अपक्ष | १३३ |
| आफशान शेख | अपक्ष | ४१ |
| मोहम्मद सय्यद | अपक्ष | ९९ |

# सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

### प्र. १५ अ

| | | |
|---|---|---|
| श्रीदेवी फुलारे | भाजप | ९८७५ (विजयी) |
| सपना मॅगेरी | काँग्रेस | ७०४६ |
| योगिता वाघमारे | बहुजन मुक्ती पार्टी | २१७ |
| आशा फुलेवार | अपक्ष | ९० |

### प्रभाग १५ ब

| | | |
|---|---|---|
| विजया खरात | भाजप | ९५७३ (विजयी) |
| कल्पना नरोटे | काँग्रेस | ७४४४ |
| मोनिका सरकार | आप | ३०४ |

### प्रभाग १५ क

| | | |
|---|---|---|
| विनोद भोसले | भाजप | १००५६ (विजयी) |
| आरिफ शेख | काँग्रेस | ६२०६ |
| महेश गाडेकर | राष्ट्रवादी | ४२२ |
| अमजद मुजावर | समाजवादी | ७९ |
| नीलेश संगेपाग | आप | ४२० |
| शिवराज तलाठी | अपक्ष | ३१७ |

### प्रभाग १५ ड

| | | |
|---|---|---|
| चेतन नरोटे | काँग्रेस | ८४९५ (विजयी) |
| अंबादास करगुळे | भाजप | ८२४४ |
| सागर शितोळे | शिवसेना | ६८५ |

### प्रभाग १६ अ

| | | |
|---|---|---|
| नरसिंह आसादे | काँग्रेस | ५८३० (विजयी) |
| रतिकांत कमलापुरे | भाजप | ५१५० |
| कुमार जंगडेकर | शिवसेना | ३४१८ |
| दीपक गवळी | वंचित | ६५३ |
| विक्रम कसबे | जनविकास क्रांती सेना | २३८ |
| केतन कसबे | अपक्ष | ६८ |
| मल्लिकार्जुन कांबळे | अपक्ष | १५९ |
| अनिल खरटमल | अपक्ष | ९९ |
| विशाल लोंढे | अपक्ष | ८० |
| अशोक वाघमारे | अपक्ष | १२१ |

### प्रभाग १६ ब

| | | |
|---|---|---|
| श्वेता खरात (खांडेकर) | भाजप | ६८६२ (विजयी) |
| बिलकिसबानू खान | काँग्रेस | २७४२ |
| प्रिती वाडे | राष्ट्रवादी | १७४७ |
| मुबरा पठाण | एमआयएम | ४५५९ |
| ॲड. बेनझीर शेख | अपक्ष | २७६ |
| साबेरा शेख | अपक्ष | १६० |

### प्रभाग १६ क

| | | |
|---|---|---|
| कल्पना कदम | भाजप | ४७७७ (विजयी) |
| सीमा यलगुलवार | काँग्रेस | २६१९ |
| मीनाक्षी शिंदे | शिवसेना | ३१७० |
| फिरदोस पटेल | एमआयएम | ४५५० |
| नफिसा पठाण | अपक्ष | ९६ |
| रोमेसा शेख | राष्ट्रवादी | १२०६ |

### प्रभाग १६ ड

| | | |
|---|---|---|
| प्रियदर्शन साठे | शिवसेना | ४६२६ (विजयी) |
| दिलीप कोल्हे | भाजप | ३७३० |
| नरसिंग कोळी | काँग्रेस | २४९६ |
| गाझी जहागीरदार | एमआयएम | ४४१५ |
| ॲड.यु.एन.बेरिया | समाजवादी | ९०६ |
| मोहन घुले | अपक्ष | १०६ |
| आर्यन पठाण | अपक्ष | ६३ |
| लियाकत पठाण | अपक्ष | ५१ |
| सोमनाथ मंडळे | जनविकास क्रांतीसेना | ११० |

### प्रभाग १७ अ

| | | |
|---|---|---|
| निर्मला जंगम | भाजप | ७९२६ (विजयी) |
| शुभांगी लिंगराज | काँग्रेस | २१८५ |
| नूतन गायकवाड | राष्ट्रवादी | ३००७ |
| लक्ष्मी माढेकर | शिवसेना | ३४३७ |
| माधुरी म्हेत्रे | एमआयएम | ५०४६ |
| वैशाली दुपारगुडे | अपक्ष | १५३ |
| आशा लोकेकर | अपक्ष | २०८ |

### प्रभाग १७ ब

| | | |
|---|---|---|
| भारतसिंग बडुरवाले | भाजप | ७१२५ (विजयी) |
| परशुराम सतारेवाले | काँग्रेस | २५५६ |
| इब्राहिम कुरेशी | राष्ट्रवादी | ३२३९ |
| मो. हारिस कुरेशी | एमआयएम | ४७९२ |
| अ.वाहिद नदाफ | अपक्ष | ४२३ |
| समर्थ मोटे | अपक्ष | ३९३२ |

### प्रभाग १७ क

| | | |
|---|---|---|
| जुगनबाई अंबेवाले | भाजप | १०२९७ (विजयी) |
| गीता गुडूर | राष्ट्रवादी (अप) | ३०२५ |
| यास्मिन पठाण | एमआयएम | ५०६१ |
| बिस्मिल्ला शिकलगर | राष्ट्रवादी (शप) | २१८८ |
| सना कागदी | अपक्ष | २१२ |
| मिराबाई बुऱ्हाणपुरे | अपक्ष | ७५० |
| आशाबी शेख | अपक्ष | १६१ |

### प्रभाग १७ ड

| | | |
|---|---|---|
| रवी कय्यावाले | भाजप | ६८९० (विजयी) |
| अंबादास गोरंटला | शिवसेना | ३६६६ |
| मोहसीन नदाफ | राष्ट्रवादी | २०७७ |
| वाहिद विजापूरे | काँग्रेस | २९०२ |
| जुबेर जब्बार | एमआयएम | ४१५८ |
| मल्लिकार्जुन पिलगेरी | आप | ५५८ |
| मुझ्झमिन कुरेशी | अपक्ष | ८० |
| रिझवान कुरेशी | अपक्ष | ५३ |
| शंकर गुंगेवाले | अपक्ष | ४३६ |

| | | |
|---|---|---|
| सूरज जगधने | अपक्ष | २७४ |
| अजय दिड्डी | अपक्ष | ५५४ |
| अविनाश बाडीवाले | अपक्ष | १६२ |
| दीपक भंडारे | अपक्ष | २२५ |
| अकील सय्यद | अपक्ष | ८१ |

### प्रभाग १८ अ

| | | |
|---|---|---|
| श्रीकांचना यन्नम | भाजप | ८४४० (विजयी) |
| निर्मला पासकंटी | शिवसेना | ८०४० |

### प्रभाग १८ ब

| | | |
|---|---|---|
| राजश्री धोडमनी | भाजप | ७०४४ (विजयी) |
| महादेवी हिटनळ्ळी | शिवसेना | ४१५८ |
| नलिनी कलबुर्गी | माकप | ५१४५ |
| निर्मला तट्टे | अपक्ष | १३०४ |

### प्रभाग १८ क

| | | |
|---|---|---|
| प्रशांत पल्ली | भाजप | ६३३३ (विजयी) |
| संतोष संगा | शिवसेना | ४५६७ |
| अंबादास नडगिरे | राष्ट्रवादी (शप) | १५०० |
| सादिक नदाफ | एमआयएम | २४१३ |
| भीमशंकर कोळी | अपक्ष | ९३६ |
| राजशेखर येमूल | अपक्ष | १४७४ |
| ईस्माइल शेख | अपक्ष | ५६९ |
| आशम फुलमामडी | अपक्ष | २२१ |

### प्रभाग १८ ड

| | | |
|---|---|---|
| शिवानंद पाटील | भाजप | ७०३४ (विजयी) |
| आयाज आळंद | काँग्रेस | ४८९० |
| सुनील निंबाळकर | शिवसेना | ४४५४ |
| विशाल गुजले | मनसे | १२९३ |

### प्रभाग १९ अ

| | | |
|---|---|---|
| कविता जंगम | भाजप | १००७४ (विजयी) |
| विजयालक्ष्मी काळपगार | काँग्रेस | २६८९ |
| प्रियांका विटकर | शिवसेना | ४७६० |
| नरस्सया बिल्ला | अपक्ष | २०९२ |

### प्रभाग १९ ब

| | | |
|---|---|---|
| व्यंकटेश कोंडी | भाजप | ९८२९ (विजयी) |
| श्रीनिवास करली | शिवसेना | ६०६५ |
| कुंदन गायकवाड | ठाकरे गट | २७८७ |
| जयराम सुंचू | अपक्ष | ७८८ |

### प्रभाग १९ क

| | | |
|---|---|---|
| कलावती गदगे | भाजप | ९९९९ (विजयी) |
| सुनंदा जमादार | शिवसेना | ६१९३ |
| राणी गंधुरे | ठाकरे गट | २५३२ |
| अनुराधा फुलपाटी | अपक्ष | ५२६ |
| छाया अलकुंटे | अपक्ष | ३९९ |

### प्रभाग १९ ड

| | | |
|---|---|---|
| बसवराज केंगनाळकर | भाजप | ९०५२ (विजयी) |
| शिवशंकर अंजनाळकर | काँग्रेस | २३४९ |
| पवन देसाई | शिवसेना | ६२२१ |
| राहुल गंधुरे | अपक्ष | २०२२ |

### प्रभाग २० अ

| | | |
|---|---|---|
| सफिया चौधरी | एमआयएम | १०९६१ (विजयी) |
| वहिदाबी शेख | भाजप | २९४९ |
| अनुराधा काटकर | काँग्रेस | १९३० |
| कुरेशा मुल्ला | राष्ट्रवादी | ६६७१ |
| तस्लिम शेख | अपक्ष | ५८६ |

### प्रभाग २० ब

| | | |
|---|---|---|
| अनिसा मोगल | एमआयएम | ११६९२ (विजयी) |
| पूजा वाघमारे | भाजप | २९५२ |
| परवीन इनामदार | राष्ट्रवादी | ७४७२ |
| नुसरत शेख | राष्ट्रवादी (शप) | ७८८ |

### प्रभाग २० क

| | | |
|---|---|---|
| अजहर हुंडेकरी | एमआयएम | १२३०४ (विजयी) |
| झीशान सय्यद | भाजप | २६६१ |
| अबूबकर सय्यद | राष्ट्रवादी | ६८३४ |
| सिध्दार्थ रणधीरे | राष्ट्रवादी | ८३९ |
| मंजूर खानापुरे | आप | ३९६ |

### प्रभाग २० ड

| | | |
|---|---|---|
| अझरोद्दीन जहागीरदार | एमआयएम | १०३६६ (विजयी) |
| अमीर शेख | भाजप | २३३४ |
| अझरोद्दीन शेख | काँग्रेस | १७४९ |
| मोहसीन शेख | शिवसेना | ७७२ |
| तौफिक शेख | राष्ट्रवादी | ७३७९ |
| अजहर शेख | आप | २९२ |
| प्रदिप बाळशंकर | अपक्ष | ९३ |
| शाकीर सगरी | अपक्ष | १२५ |
| नय्युम सालार | अपक्ष | २२ |

### प्र.२१ अ

| | | |
|---|---|---|
| संगीता जाधव | भाजप | ६६९१ (विजयी) |
| पूजा खंदारे | शिवसेना | २३८१ |
| प्रतीक्षा निकाळजे | काँग्रेस | ४९८९ |

### प्रभाग २१ ब

| | | |
|---|---|---|
| शिवाजी वाघमोडे | भाजप | ६६९८ (विजयी) |
| रियाज हुंडेकरी | काँग्रेस | ४७८६ |
| अक्षय पकाले | शिवसेना | १९१३ |
| राजकुमार भोसले | अपक्ष | ९२ |
| संजय म्हेत्रे | अपक्ष | २७१ |
| श्रद्धेश पाटील | अपक्ष | ३०९ |

### प्रभाग २१ क

| | | |
|---|---|---|
| मंजिरी किल्लेदार | भाजप | ६९५७ (विजयी) |
| किरण टेकाळे | काँग्रेस | ५०८० |
| मीना दास | शिवसेना | १४८३ |
| ललिता मनसावले | अपक्ष | १४१ |
| ॲड. शर्वरी रानडे | अपक्ष | २८९ |
| बिल्कीस सय्यद | अपक्ष | ११५ |

### प्रभाग २१ ड

| | | |
|---|---|---|
| सात्विक बडवे | भाजप | ७११४ (विजयी) |
| भीमाशंकर म्हेत्रे | ठाकरे गट | ४६९३ |
| संकेत वाघमोडे | वंचित बहुजन आघाडी | ९७५ |
| अमितकुमार अजनाळकर | अपक्ष | ३२७ |
| हणमंता कोटे | अपक्ष | २३६ |
| संतोष भोसले | अपक्ष | ६०६ |

### प्रभाग २२ अ

| | | |
|---|---|---|
| दत्तात्रय नडगिरी | भाजप | ७९१७ (विजयी) |
| संजय हेमगड्डी | काँग्रेस | २८०७ |
| अजित बनसोडे | राष्ट्रवादी | २९३५ |
| सुधीर संगेपाग | शिवसेना | १६६२ |
| सचिन कोलते | एमआयएम | ४७९६ |
| कीर्तिपाल घोडंगुबे | वंचित | ६६१ |
| मधुकर आठवले | अपक्ष | ६६२ |

### प्रभाग २२ ब

| | | |
|---|---|---|
| अंबिका गायकवाड | भाजप | ८०४८ (विजयी) |
| अर्चना जाधव | काँग्रेस | २४९१ |
| अंजू गायकवाड | शिवसेना | २३५३ |
| अंबिका जाधव | राष्ट्रवादी | २९९९ |
| शोभा जाधव | एमआयएम | ५०६७ |
| अपर्णा माने | अपक्ष | ८५ |
| विद्या माने | अपक्ष | ८४ |

### प्रभाग २२ क

| | | |
|---|---|---|
| चैताली जाधव | भाजप | ७४०५ (विजयी) |
| राजनंदा डोंगरे | काँग्रेस | २८८८ |
| अनिता बुक्कानुरे | शिवसेना | २२४९ |
| तहेसीन शेख | राष्ट्रवादी | ३००३ |
| असीया शेख | एमआयएम | ४६६६ |
| सुषमा फडतरे | वंचित | ९६० |
| सुरभी गायकवाड | अपक्ष | १६८ |

### प्रभाग २२ ड

| | | |
|---|---|---|
| किसन जाधव | भाजप | ६८३२ (विजयी) |
| कुणाल गायकवाड | काँग्रेस | २४२६ |
| नितीन गायकवाड | शिवसेना | १६०० |
| जुबेर शेख | राष्ट्रवादी | ३३८१ |
| सिराज शेख | एमआयएम | ४२४७ |
| रमेश सुतकर | वंचित | ८२२ |
| संगणबसप्पा बिराजदार | रिपाइं | ४६ |
| अनिल जाधव | अपक्ष | ४१३ |
| बालाजी जाधव | अपक्ष | ९४ |
| वसंत जाधव | अपक्ष | ४९ |
| शितल गायकवाड | अपक्ष | १४३६ |
| सरफराज शेख | अपक्ष | ११५ |

### प्रभाग २३ अ

| | | |
|---|---|---|
| सत्यजित वाघमोडे | भाजप | ७०७५ (विजयी) |
| अनिल बनसोडे | राष्ट्रवादी | १११६ |
| मदन पोलके | शिवसेना | ४१९० |
| सुनीता रोटे | राष्ट्रवादी (शप) | ४५८१ |
| धर्मराज डुरके | वंचित | ११३५ |
| नवनाथ भजनावळे | अपक्ष | ८२ |
| भारत हत्तीकट्टी | अपक्ष | १५९ |

### प्रभाग २३ ब

| | | |
|---|---|---|
| आरती वाकसे | भाजप | ९२१३ (विजयी) |
| दीपाली शाह | काँग्रेस | ३४१० |
| कृष्णाबाई बिरादार | शिवसेना | ४०३२ |
| मेनका राठोड | अपक्ष | ११०६ |
| सकियाबानो बिराजदार | अपक्ष | ४२४ |

### प्रभाग २३ क

| | | |
|---|---|---|
| ज्ञानेश्वरी देवकर | भाजप | ७८१८ (विजयी) |
| लता गायकवाड | शिवसेना | ४४८१ |
| अलका राठोड | ठाकरे गट | ३७६८ |
| चित्रा कांबळे | राष्ट्रवादी | ११४४ |
| सुगंधा कोळी | बसपा | ८५६ |
| रूपाली चोळ्ळे | अपक्ष | १४८ |

### प्रभाग २३ ड

| | | |
|---|---|---|
| राजशेखर पाटील | भाजप | ७७८२ (विजयी) |
| प्रकाश राठोड | शिवसेना | ३९४६ |
| लक्ष्मण जाधव | ठाकरे गट | ४४६७ |
| राहुल जरग | बसपा | ७८६ |
| सुभाष गायकवाड | वंचित | ७४७ |
| वैभव राऊत | अपक्ष | ६० |
| हरी चव्हाण | अपक्ष | १६१ |
| विजय चोळ्ळे | अपक्ष | ६१ |
| बादशाह शफी | अपक्ष | २५३ |

### प्रभाग २४ अ

| | | |
|---|---|---|
| मधुसूदन जंगम | भाजप | ७४८० (विजयी) |
| शिवलिंग कांबळे | काँग्रेस | ५५७१ |
| सतीश म्हस्के | शिवसेना | २१६४ |
| अभिषेक कटकधोंड | अपक्ष | ६७ |
| संगिता जाधव | अपक्ष | १२१ |
| विपूल थोरे | अपक्ष | १३४ |
| श्रीशैल रणखांबे | अपक्ष | ७७ |
| सातलिंग स्वामी | अपक्ष | २६० |

### प्रभाग २४ ब

| | | |
|---|---|---|
| वनिता पाटील | भाजप | ८५२१ (विजयी) |
| उषा काळे | शिवसेना | ४६०२ |
| चंदा काळे | ठाकरे गट | २२५० |
| रश्मी गायकवाड | अपक्ष | १९२९ |

### प्रभाग २४ क

| | | |
|---|---|---|
| अश्विनी चव्हाण | भाजप | १०३०८ (विजयी) |
| शैलजा राठोड | अपक्ष (शिवसेना पुरस्कृत) | २५६२ |
| रश्मी गायकवाड | अपक्ष | १९२९ |

### प्रभाग २४ ड

| | | |
|---|---|---|
| नरेंद्र काळे | भाजप | ७८३० (विजयी) |
| राजू चव्हाण | काँग्रेस | ३९४३ |
| विकास कदम | शिवसेना | ३१४६ |
| आनंदकुमार जाधव | आप | १५२ |
| विरेश चडचणकर | अपक्ष | २३२ |
| विजय चोळ्ळे | अपक्ष | ६४ |
| विनायक पवार | अपक्ष | ४१ |
| बसवराज बगले | अपक्ष | १६५ |
| श्रुती बंडे | अपक्ष | ९१ |
| संपन्ना दिवाकर | अपक्ष | ११६ |

### प्रभाग २५ अ

| | | |
|---|---|---|
| सुमन चाबुकस्वार | भाजप | ६०१८ (विजयी) |
| सरस्वती आठवले | काँग्रेस | २७६६ |
| सुरेखा काळे | राष्ट्रवादी | ४७०६ |

### प्रभाग २५ ब

| | | |
|---|---|---|
| वैभव हत्तूरे | राष्ट्रवादी | ५१२८ (विजयी) |
| नागेश ताकमोगे | भाजप | ४८३९ |
| विजयकुमार हत्तुरे | काँग्रेस | १८७५ |
| धनंजय कारंडे | शिवसेना | १५४५ |
| मकबुल मुल्ला | प्रहार | ६२ |
| चंद्रकांत नवत्रे | अपक्ष | १६ |
| सिद्धेश्वर माळी | अपक्ष | ५२ |
| अब्दुल मुल्ला | अपक्ष | ६२ |

### प्रभाग २५ क

| | | |
|---|---|---|
| वैशाली भोपळे | भाजप | ४९५४ (विजयी) |
| रिझवान सगरी | काँग्रेस | १८८२ |
| सुकेशनी गंगोडा | राष्ट्रवादी | ४२४५ |
| शोभा चौगुले | शिवसेना | २३०९ |
| शारदा बिराजदार | अपक्ष | १५४ |
| अर्चना साळुंके | अपक्ष | ११७ |

### प्रभाग २६ अ

| | | |
|---|---|---|
| संगीता जाधव | भाजप | ८९४६ (विजयी) |
| किरण सर्वगोड | राष्ट्रवादी | १५०९ |
| नागिणी इरकशेट्टी | राष्ट्रवादी (शप) | ११९४ |
| संगीता सुरवसे | वंचित | ५९१ |
| पल्लवी कांबळे | बीएसपी | ४४८ |
| निशिगंधा भडकुंबे | अपक्ष | ११५३ |

### प्रभाग २६ ब

| | | |
|---|---|---|
| दीपक जमादार | भाजप | ९८३१ (विजयी) |
| रविकुमार यलगुलवार | काँग्रेस | २६३१ |
| राजेश काळे | अपक्ष | ३९८ |
| अरूण मोरे | अपक्ष | ७०० |

### प्रभाग २६ क

| | | |
|---|---|---|
| जयकुमार माने | भाजप | ८३३३ (विजयी) |
| नितीन घुगे | काँग्रेस | १६७९ |
| सागर हत्तुरे | राष्ट्रवादी | १३८८ |
| सुहास सुरवसे | बसपा | ८०३ |
| प्रिया परदेशी | अपक्ष | ९३ |
| प्रेम राठोड | अपक्ष | ७९ |
| श्रीशैल हिरेठ | अपक्ष | १६४९ |

# सोमपातील सर्वात कमी वयाच्या उच्चशिक्षित नगरसेविका होण्याचा मान मृण्मयी गवळीला !

सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ६ मधून निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या उच्चविद्याविभूषित नगरसेविका मृण्मयी महादेव गवळी हिने वयाच्या २५ व्या वर्षी सोलापूर महानगरपालिकेत सर्वात कमी वयाच्या नगरसेविका होण्याचा मान मिळविला आहे. गवळी वस्ती तालीम संघाचे संस्थापक महादेव गवळी यांची मृण्मयी ही कन्या आहे. सोलापूर विद्यापीठामध्ये लेक्चरर आहे. भाषेवर वक्तृत्व आणि म हिलांच्या प्रश्नांची जाण असलेल्या नगरसेविका म्हणून मृण्मयी गवळी या सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका म्हणून कामकाज पाहणार आहेत.



# भाजप आमदाराचे भाऊजी, सर्वाधिक १४ हजार मताधिक्यांनी विजयी



सोलापूर : पश्चिम महाराष्ट्राचं लक्ष लागलेल्या सोलापूर महापालिकेत भाजपने एकतर्फी सत्ता मिळवली आहे. ७५ पारचा नारा यशस्वी ठरवत सोलापूर महापालिकेत भाजपने तब्बल ८७ जागावर विजय मिळवलाय. त्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे या त्रिकुटची रणनीती यशस्वी ठरल्याचे दिसतं आहे. भाजपचा दणदणीत विजय झाला असला तरी अनेक प्रभागात चूरशीच्या लढती देखील पाहायला मिळाल्या. भाजपचे प्रभाग ३ मधील उमेदवार संजय कोळी यांचा अवघ्या १९ मतांनी महापालिका निवडणुकीत विजय झाला. त्यांनी भाजपचे म ाजी सभागृह नेते आणि यंदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले सुरेश पाटील यांचा पराभव केला. तर सोलापूर महापालिका निवडणुकीत भाजपचेच विनायक कोंड्याल हे सर्वाधिक मताधिक्याने विजयी झाले. प्रभाग १२ अ मधून भाजपाकडून रिंगणात असलेले विनायक कोंड्याल यांना १६३८१ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीनिवास पोतन यांना अवघी २२३० मते मिळाली. त्यामुळे कोंड्याल हे तब्बल १४ हजार १५१ मतांनी विजयी झाले.

**भाजप आमदार देवेंद्र कोठेंचा म हापालिकेत दबदबा, भावजी सर्वाधिक मताधिक्याने विजयी**

सोलापूर महापालिकेत आमदार देवेंद्र कोठे यांचे बंधू प्रथमेश कोठे हे देखील मोठ्या मतधिक्यानी विजयी झाले. प्रभाग १० ड मध्ये प्रथमेश कोठे हे तब्बल १२ हजार ४८६ मतांनी विजयी झाले. त्यांच्या पॅनलमधील प्रभाग १० अ मधील उमेदवार उज्वला दासरी ह्या १२४२४, १० ब मधील उमेदवार दीपक येलदंडी ११ हजार १३ मताधिक्याने विजयी झाले.

प्रभाग १२ मध्ये देखील आमदार देवेंद्र कोठे यांचा दबदबा कायम राहिला. आम दार देवेंद्र कोठे यांचे भावजी असलेले विनायक कोंड्याल सोलापुरात सर्वाधिक १४१५१ इतक्या मताधिक्याने विजयी झाले. या संपूर्ण प्रभागात विरोधकांना अक्षरशः धूळ कोठे समर्थक भाजप उमेदवारांनी चारली. प्रभाग १२ ब मध्ये सारिका खजूरगी ह्या १२१४०, १२क मध्ये अर्चना वडनाल ११४६६, १२ड मध्ये सिद्धेश्वर कमटम हे ११४६६ मताधिक्यानी विजयी झाले.

प्रभाग ३ मध्ये भाजपच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्ष रंजिता चाकोते यांनी देखील मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. रंजिता चाकोते यांना १५२४२ तर विरोधात असलेल्या काँग्रेसच्या रमाबाई पांडगळे यांना ३५६१ मते मिळाली. त्यामुळे रंजिता चाकोते यांचा तब्बल ११६८४ म ताधिक्याने विजय झाला. आमदार देवेंद्र कोठे यांच्या सासू माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांना मात्र निसटता विजय झाला. प्रभाग १८ अ मध्ये श्रीकांचना यन्नम अवघ्या ४०० च्या फरकाने विजयी झाल्या.

**अटीतटीच्या लढतीत केवळ १९ म तांनी उमेदवार विजयी**

सोलापुरात अनेक प्रभागात अटीतटीचा सामना देखील पाहायला मिळाला. प्रभाग ३ ड मधील भाजप उमेदवार संजय कोळी आणि शिवसेना उम ेदवार सुरेश पाटील यांच्यातली लढत सर्वाधिक चूरशीची राहिली. कोळी याना ८०५० तर पाटील यांना ८०३१ मते मिळाली. अवघ्या १९ मतांनी संजय कोळी विजयी झाले. प्रभाग ७ क मध्ये देखील भाजप उमेदवार उत्तरा बरडे-बचूटे आणि शिवसेना उमेदवार मनोरमा सपाटे यांच्यात तुल्यबळ लढत झाली. या सामन्यात मनोरमा सपाटे अवघ्या ८८ मतांनी विजयी झाल्या.

प्रभाग ५ ची निवडणूक सर्वाधिक चर्चेत राहिली. राष्ट्रवादी विरुद्ध भाजप विरुद्ध भाजप बंडखोर असा तिहेरी सामना या प्रभागात झाला. अटीतटीच्या लढतीत भाजपच्या चार ही उमेदवारांचा या प्रभागात विजय झाला. राष्ट्रवादीचे नेते आणि दलित चळवळीतील प्रभावी नेते असलेले आनंद चंदनशिवे यांचं प्रभाग ५ मधून पराभूत झाले. प्रभाग ५ ड चे भाजप उमेदवार बिज्जू प्रधाने हे अवघ्या ८३५ मतांनी विजयी झाले. त्यांनी भाजप बंडखोर राजू आलूरे यांचा पराभव केला. तर मुस्लिम बहुल असलेल्या प्रभाग १४ ड मध्ये एमआयएम विरुद्ध काँग्रेस असा अटीतटीचा सामना झाला. काँग्रेसचे तरुण उमेदवार शोएब महागामी यांनी कडवी झुंज दिली. मात्र एमआयएमचे उमेदवार तौफिक हत्तुरे हे अवघ्या ४२२ मतांनी विजयी झाले.

**सोलापूर महापालिकेत काँग्रेसचा लाजिरवाणा पराभव, शहराध्यक्षांनी राखला अवघ्या २५१ मतांनी गड**

सोलापुरात काँग्रेस कधीकाळी सत्तेत होती. मात्र यंदाच्या निवडणूकीत काँग्रेसचा लाजिरवाणा पराभव झाला. काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांचे नेतृत्व असताना ही सोलापुरात केवळ २ जागा काँग्रेसला जिंकता आल्या. ते ही अत्यंत कमी मताधिक्याने. काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे हे प्रभाग १५ ड मधून विजयी झाले. अवघ्या २५१ मतांनी चेतन नरोटे यांनी गड राखला. तर प्रभाग १६ अ मध्ये काँग्रेस उमेदवार नरसिंह आसादे यांनी ६८० मतांनी विजयश्री खेचून आणला. यांचं प्रभाग १६ क मध्ये एमआयएमच्या फिरदोस पटेल यांचा निसटता पराभव झाला. भाजप उमेदवार कल्पना कदम यांनी २२७ मतांनी त्यांच्यावर विजय मि ळवला.

**राष्ट्रवादीचा ७५ पारचा नारा फेल, केवळ एका पठ्याने मारलं मैदान**

सोलापूर महापालिकेत राष्ट्रवादी अजित पवार गटाने ७५ पारचा नारा दिला होता. मात्र अवघ्या एका जागेवर अजित पवार गटाला विजय मिळवता आला. ते ही अत्यंत कमी मताधिक्याने. प्रभाग २५ ब मध्ये राष्ट्रवादीचे उमेदवार वैभव हत्तुरे यांनी भाजपा उमेदवार नागेश ताकमोगे यांचा पराभव केला. नागेश ताकमोगे हे माजी आमदार दिलीप म ाने यांचे कट्टर समर्थक आणि प्रभावी नेते आहेत. मात्र त्यांना २८९ मतांनी पराभवाची धूळ चारली. एमआयएमची कामगिरी देखील सोलापूर महापालिकेत लक्षवेधी राहिली. प्रभाग १६ ड मध्ये एमआयएमचे माजी नगरसेवक गाजी जहागीरदार हे अवघ्या २११ मतांनी पराभूत झाले. शिवसेनेचे उमेदवार प्रियदर्शन साठे यांनी त्यांचा आणि माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांचा पराभव केला.

# १७ जानेवारी २०२६ रोजी, गोधनविकास, जीवनज्योत बहू. सेवा संस्था आणि सक्षम (समदृष्टि क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल, नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने

चैतन्य गृह निर्माण संस्था सोलापूर येथे मोफत निसर्गोपचार , आयुर्वेद मार्गदर्शन, मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न : सदर कार्यक्रम वेळी

* मोफत रक्तदाब (इझ) तपासणी

आयुर्वेद उपचार प्रणाली,

आयुर्वेद व निसर्गोपचार तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व सल्ला

* आवश्यकतेनुसार आयुर्वेदिक/पंचगव्य औषधे (नाममात्र शुल्कावर)

* वैयक्तिकृत आहार व दिनचर्या



हवाविषयी माहिती देण्यात आली.

ह्यावेळी डॉ संदीप माने, श्रीपाद मोळक , गोधन



विकास संस्थेच्या वैशाली कुलकर्णी, वरुण कुलकर्णी आदी. मान्यवर उपस्थित होते.

# वीरशैव पंडित परीक्षेत केंद्रातून प्रथम प्रा. डॉ.शिला स्वामी

श्रीकाशी जगदगुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ जंगमवाडी मठ,वाराणसी आयोजित वीरशैव सिध्दांत पंडित परिक्षेत तुळजापुर केंद्रातून प्रा.डॉ शिला कमलाकर स्वामी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल श्रीकाशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व काशी जगद्गुरु १००८ डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी आशीर्वाद दिला. प्रा.डॉ.शिला कमलाकर स्वामी ह्या श्री माधवराव पाटील महाविद्यालय, म रूम,ता.उमरगा,जि.धाराशिव येथे गेली ३५ वर्षे इतिहास विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. धर्म,संप्रदाय,पंचपीठे, जगद्गुरु,परंपरा यांचाअभ्यास होण्यासाठी श्रीकाशी जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ जंगमवाडी मठ वाराणसी आयोजित वीरशैव सिद्धांत पंडित परीक्षा दिली. त्यांना लहानपणापासूनच त्यांच्या कुटुंबातून धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले,संस्कार,संस्कृतीची जडणघडण त्याना त्यांच्या वडीलाकडूनच जोपासली आहे.आपण घेतला वसा फक्त स्वत:पुरतेच मर्यादीत न ठेवता समाजातील लोकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. याचीच प्रचिती म्हणून त्यांना पंडित परीचतेन यश प्राप्त झाले. या यशाबद्दल आचलेर येथील सुतरेश्वर शिवाचार्य महास्वामीजीनी आशीर्वाद



दिला आहे. संबंधित केंद्र संचालकांचे अंतकरणपूर्वक हार्दिक अभिनंदन. माझी ग्रामीण विकास राज्यमंत्री मा.बसवराज पाटील साहेब,नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष तथा मुरूम नगरीचे नगराध्यक्ष मा. बाबुरावजी पाटील साहेब,उमरगा जनता सहकारी बँकेचे संचालक शरणजी पाटील साहेब,केंद्र संचालीका सौ.अमृता बचाटे मॅडम,श्रीयुक्त बचाटे दादा,श्रीयुक्त बलचुरे,श्रीयुक्त बडोरे तसेच ब्रह्ममठ होटगी शिक्षण संस्थेचे सचिव माननीय शांतय्या स्वामी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाचे (अंतरविद्याशाकीय अभ्यास विद्याशाखा) अधिष्ठता प्राचार्य डॉ.राजशेखर हिरेम ठ, श्री माधवराव पाटील म हाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रा डॉ शीला कमलाकर स्वामी यांचे अभिनंदन केले.

# खंडोबाचीवाडी येथे आज किशोर व किशोरी गट खो-खो स्पर्धा

सोलापूर, दि. १७ जानेवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने किशोर व किशोरी गट (१४ वर्षाखालील) खो-खो स्पर्धांचे आयोजन रविवारी १८ जानेवारीला मोहोळ तालुक्यातील खंडोबाचीवाडी येथे खंडोबा मंदिराच्या पाठीमागील मैदानावर करण्यात आले आहे. बाळराजे खो-खो क्लब खंडोबाचीवाडी यांच्या वतीने ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुले व मुली दोन्ही संघातील विजयी संघांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व उत्तेजनार्थ बक्षीस अनुक्रमे ११, ०००/-, ७७७७/-, ५५५५/-, ३३३३/-, ३०००/- व ट्रॉफी देण्यात येणार आहे. संपूर्ण स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट खेळ करणाऱ्या मुले व मुली संघातील खेळाडूंना वैयक्तिक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू, उत्कृष्ट संरक्षक व उत्कृष्ट आक्रमक खेळाडू निवडून बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी किशोर गुंड (मो. ९९२१७७०३०३) यांच्याशी संपर्क साधावा.

# सोलापुरातील ४ युवांचा विजय लक्षवेधी





सोलापूर : येथील महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवत १०२ पैकी तब्बल ८७ जागांवर एकतर्फी सत्ता मिळवली आहे. या दणदणीत यशात अनेक नवे चेहरे पुढे आले असले, तरी मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांनी जाहीर पाठिंबा दिलेल्या एका तरुण उमेदवाराची चर्चा विशेष रंगताना पाहायला मिळते आहे. सात्विक प्रशांत बडवे असे या विजयी उमेदवाराचे नाव असून, वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी सात्विक बडवे नगरसेवक झाला आहे. सोलापूर महापालिकेतील प्रभाग क्रमांक २१-ड मधून भाजपकडून निवडणूक लढवणाऱ्या सात्विक बडवे यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) चे उमेदवार भीमाशंकर म्हेत्रे यांचा पराभव केला. या निवडणुकीत सात्विक बडवे यांना ७११४ मते, तर भीमाशंकर म्हेत्रे यांना ४६९३ मते मिळाली. २४२१ मतांच्या फरकाने सात्विक बडवे यांनी दणदणीत विजय संपादन केला.

सात्विक बडवे यांच्या प्रचारासाठी मराठी कलाविश्वातील अनेक नामवंत कलाकारांनी पाठिंबा देत शुभेच्छा दिल्या शिवाय मतदानासाठी साद घातली होती. ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले, अलका कुबल, प्रिया बेर्डे, पंकज विष्णू, जयराज नायर, ओंकार कर्वे, शर्वरी जेमेनीस, स्वप्नील रास्ते, शंतनू गंगणे, नितीन भंजन, वैखरी भंजन-पाठक, विघ्नेश जोशी, ऐश्वर्या नारकर, प्रमोद पवार आणि टीना घई यांच्यासह अनेक कलाकारांनी सात्विकसाठी उघडपणे मतांची साद घातली होती. या कलाकारांनी केलेले आवाहनाचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते.

अवघ्या २५ वर्षांची मृण्मयी सोलापूर महापालिकेत

सोलापूर महापालिका निवडणुकीत यंदा अनेक दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागला असताना, नव्या पिढीने मात्र ठळक उपस्थिती नोंदवली आहे. या निवडणुकीत तरुण नेतृत्वाचा उदय स्पष्टपणे दिसून आला. प्रभाग क्रमांक ६-क मधून निवडणूक लढवणाऱ्या मृण्मयी गवळी यांनी दणदणीत विजय मिळवत सोलापूर महापालिकेत नगरसेवक होण्याचा मान पटकावला आहे. अवघ्या २५ वर्षांच्या वयात मृण्मयी यांनी मतदारांचा विश्वास संपादन करत थेट विजयाची झेप घेतली. या प्रभागात त्यांच्यासमोर शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार पूजा चव्हाण यांचे आव्हान होते. मात्र मतमोजणीत मृण्मयी गवळी यांना ९६०५ मते, तर पूजा चव्हाण यांना ६३४३ मते मिळाली. ३२६२ मतांच्या फरकाने मृण्मयी यांनी विजय मिळवला.

पत्रकार लेकाने पुसला वडिलांचा एक मताचा पराभव, मुलाने भरून काढली कसर

सोलापूर महापालिकेत यंदा १०२ पैकी तब्बल ७० नवीन चेहरे पाहायला मिळणार आहेत. पहिल्यांदाच निवडणूक रिंगणात उतरलेले अनेक तरुण विजयी झाले असून, त्यात सत्यजित वाघमोडे यांचे नाव विशेष लक्षवेधी ठरते. प्रभाग क्रमांक २३ मधून भाजपचे उमेदवार असलेले सत्यजित वाघमोडे हे ३२ वर्षांचे असून त्यांनी पत्रकार म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली. आघाडीच्या वृत्तवाहिनीत काम केल्यानंतर मागील वर्षभरापासून सत्यजित सामाजिक कार्यात सक्रिय झाले होते. सत्यजित यांचे वडील सुबोध वाघमोडे हे सोलापुरातील आंबेडकरी चळवळीतील मोठे नाव आहे. २००७ च्या महापालिका निवडणुकीत सुबोध वाघमोडे हे आरपीआय–काँग्रेस युतीकडून निवडणूक लढले होते, मात्र अवघ्या एका मताने त्यांचा पराभव झाला होता. यंदाच्या निवडणुकीत मात्र सत्यजितने ती कसर भरून काढली. त्यांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) च्या उमेदवार, माजी नगरसेविका सुनीता रोटे यांचा २४,९४ मतांनी पराभव करत नगरसेवकपद मिळवले.

पूजा वाडेकर सर्वात तरुण नगरसेविका, माजी आमदाराच्या कन्येचा केला पराभव

सोलापूर महापालिकेत सर्वात पूजा श्रीकांत वाडेकर ही सर्वात कमी वयाची नगरसेविका असणार आहे. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी पूजाने महापालिका निवडणुकीत विजय मिळवलाय. प्रभाग ९ क मधून पूजा ही भाजपच्या तिकिटावर निवडणुकीच्या रिंगणात उतरली होती. हा प्रभाग माकपचा गड मानला जातो. त्यामुळे पूजा विरोधात माकपने माजी आमदार नरसय्या आडम यांची कन्या अरुणा आडम यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं होत. मात्र, अरुणा आडम यांचा तब्बल ११,२९७ मतांनी आमदार कन्येचा पराभव केला मतांनी पराभव करून पूजा श्रीकांत वाडेकर ह्या सर्वात कमी वयाच्या नगरसेविका ठरल्या आहेत.

# लोकशक्ती शुगर साखर कारखान्याचे ३१ डिसेंबर पर्यतचे ऊस बिल शेतकरी बांधवांच्या खात्यावर जमा

दैनिक राजस्व अशोक सोनकंटले प्रतिनिधी/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालूक्यातील लोकशक्ति शुगर अँण्ड अलाईड इं.लि. कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२६ मधील ३१ डिसेंबर २०२५ पर्यतचे गळीतास आलेल्या ऊसाचा हप्ता रक्कम रुपये २८५०/- याप्रमाणे ऊस उत्पादक शेतकरी यांचे बँक खातेवर वर्ग करण्यात आलेले आहे. असे कारखान्याचे चेअरमन मा.श्री.मानसिंग खोराटे यांनी माहिती दिली.गळीत हंगाम २०२५-२६ करिता कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक व पुरवठादार यांचेकडून ऊस बिलाची रक्कम वेळेत जमा केल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे. त्याच बरोबर यापुढे गळीतास येणा-या ऊसाचे बिल वेळेत अदा करणेकरिता लोकशक्ति शुगर कारखान्याचे व्यवस्थापन कटिबध्द आहे असे कारखान्याचे चेअरमन श्री. खोराटे यांनी मत व्यक्त केले. तसेच शेतकरी यांचे हित समोर ठेवून गाळपास आलेल्या ऊसाचे बिल १६ दिवसांत बँक खातेत वर्ग करण्याची परंपरा कायम राहणार असेही त्यांनी सांगितले.तरी कार्यक्षेत्रातील



सर्व ऊस उत्पादक व पुरवठा यांनी लोकशक्ति शुगर कारखान्यास जास्तीत जास्त ऊस गळीतास पाठवून सहकार्य करावे असे मा.श्री.खोराटे यांनी आवाहन केले.यावेळी कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. पृथ्वीराज खोराटे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय मराठे, कार्यालयीन अधीक्षक श्री. विवेक पवार, शेतकी अधिकारी श्री. राजाराम पवार, उस पुरवठा अधिकारी श्री. राजशेखर निगफोडे, चीफ इंजिनिअर श्री. सिद्धेश्वर शिंदे, चीफ केमिस्ट श्री. नागेश पवार, इलेक्ट्रिकल मॅनेजर श्री. अखिल बिटे, इन्स्टुमेंटेशन मॅनेजर श्री. उमराणी, सिव्हिल इंजिनिअर श्री. संजीव करजगी, फायनान्स विभाग ८प्रमुख श्री. बाबासाहेब गायकवाड, सुरक्षा अधिकारी श्री. चंद्रकांत राठोड तसेच सर्व पदाधिकारी, कर्मचारीवृंद, ऊस तोडणी व वाहतूक ठेकदार उपस्थित होते.

# हत्तरसंग ग्रामदैवत श्री संगम्मादेवी यात्रा महोत्सवास मंगळवार पासून प्रारंभ

## ६४ लाख ९१हजार रुपयांची भेसळयुक्त सुपारी जप्त

दैनिक राजस्व
अशोक सोनकंटले
प्रतिनिधी/दक्षिण सोलापूर

सालाबादप्रमाणे यावर्षी देखील सुक्षेत्र हत्तरसंग ता.द. सोलापूर येथील ग्रामदैवत श्री संगम्मादेवी यात्रा महोत्सवास मंगळवार पासून प्रारंभ होणार असून मंगळवार दि. २०-०१-२०२६ ते बुधवार दि. २८-०१-२०२६ पर्यंत दररोज सायंकाळी ६.30 ते ८.00 पर्यंत महाशिवशरणी भिमांबिके, इटगी यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले असून प्रवचनकार श्री. शंभुलिंग शास्त्रीगळु हिरेमठ,रटगल ता. आळंद. जि गुलबर्गा (माणिक्यरत्न प्रशस्तीपत्र विजेता) यांच्या अमृत रसाळवाणीने संपन्न होणार आहे.

त्याच्या सोबत संगितसेवे श्री. काळप्पा गवईगळु (आकाशवाणी व दूरदर्शन कलाकार), बंठनहळ्ळी जि. कलबुर्गी तर तबलावादक मल्लिनाथ नरोणे, (आकाशवाणी व दूरदर्शन कलाकार),भुशाल, जि. कलबुर्गी यांच्या सहकार्याने प्रवचन होणार आहे.

मंगळवार दि. २७/१/२०२६ रात्री १०.00 वा. श्री संगमेश्वर भजनी मंडळ,कुडल, श्री संगम्मादेवी भजनी मंडळ, हत्तरसंग, श्री आदिशक्ती महिला मंडळ,हत्तरसंग यांचे भजनी कार्यक्रम होणार आहे.बुधवार दि. २८/१/२०२६ रोजी पहाटे ५.00 वा. महारुद्राभिषेक व होम हवन तसेच सकाळी ८.00 वा. श्री संगम्मादेवी मुर्ती मिरवणुक व सहस्त्रकुंभ मेळावा,विरभद्र पुरवंत कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानंतर

धर्मसभा सकाळी १० वाजता होणार असून त्या धर्मसभेचे अध्यक्ष

श्री.म.नि.प्र. शिवानंद महास्वामिजी विरक्तमठ, करजगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर नेतृत्व :

श्री.वे.मु. महांतेश शास्त्री हिरेमठ,

तद्देवाडी ता. इंडी, जि. विजयपूर.

प्रमुख अतिथी म्हणून श्री. षडाक्षरी शास्त्री(कणेरी मठ,कोल्हापूर),

हत्तरसंग.ता.द.सोलापूर,श्री. आनंद शास्त्री, बरुर, ता.द. सोलापूर आणि श्री. प्रशांत महाराज संख,ता. जत. जि.सांगली यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तरी श्री संगम्मादेवी यात्रा महोत्सव कार्यक्रमासाठी भक्तगणांनी सढळ हाताने मदत करावे आणि हत्तरसंग कुडल पंचक्रोशीतील सद भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटी कडून करण्यात आले आहे.



# सोलापूर महापालिकेत सर्वात कमी वयाच्या नरसेविकेचा मान मिळाला भाजपच्या पूजा वाडेकर यांना

सोलापूर दि.१७ जानेवारी

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मधून निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका सौ.पूजा श्रीकांत वाडेकर वयाच्या २३ व्या वर्षी सोलापूर महानगरपालिकेत सर्वात कमी वयाच्या नगरसेविका होण्याचा मान मिळविला आहे. सौ पूजा श्रीकांत वाडेकर यांचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले असून, समाजकारण आणि राजकारण दोन्हीची सांगड घालून त्या आपले पती श्रीकांत वाडेकर त्याचप्रमाणे मोठे जितू आणि बापूसाहेब वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका म्हणून कामकाज पाहणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, त्यांनी प्रभाग क्रमांक ९ क मधून विक्रमी असे १४८२३ मते मिळवत माजी आमदार आडम मास्तर यांच्या कन्या अरुणा आडम माकपा ३५२६ यांचा दारुण पराभव केला. राजकारणात आणि समाजकारणात वाडेकर कुटुंबीयांचे महत्त्वाचे योगदान असून, त्या कामाच्या जोरावर पूजा श्रीकांत वाडेकर कमी वयात महापालिकेत यशस्वीरित्या कामकाज पाहणार आहेत.

या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जास्तीत जास्त युवा मतदारांना या निवडणुकीत संधी दिली, पूजा श्रीकांत वाडेकर ह्यांनी प्रभाग क्रमांक ९ मधून निवडणूक लढवली. आणि प्रभाग क्रमांक ९ मध्ये संपूर्ण भारतीय जनता पक्षाचे पॅनल विजयी झाले.

पूजा श्रीकांत वाडेकर ह्या कमी वयाच्या उमेदवार आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या माध्यमातून प्रभागातील विकासकामांवर जास्तीत जास्त लक्ष देणार असल्याचे पूजा श्रीकांत वाडेकर यांनी सांगितले.

# सोलापूर महानगरपालिकेवर भाजपाचा दणदणीत विजय!



देवाभाऊंच्या सक्षम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वात सोलापुरात भारतीय जनता पार्टीने ८७ जागांवर ऐतिहासिक विजय मिळवला आहे. हा विजय केवळ आकड्यांचा नसून, विकास, पारदर्शकता आणि लोकहिताच्या राजकारणावर जनतेने व्यक्त केलेला ठाम विश्वास आहे. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाने केलेल्या कार्याला जनतेची स्पष्ट मान्यता मिळाली आहे.

निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

या ऐतिहासिक यशासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पक्षश्रेष्ठींचे मनापासून आभार!

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajaswa Dainik Rajaswa News